# फक्त भारतीय — भारतीय आम्ही ----

नित्य एकची ध्यास मनासी
फक्त भारतीय, भारतीय आम्ही

नाही हिंदू, शीख, पारसी
बौद्ध, जैन वा मुस्लिम, ख्रिस्ती
धर्म एकची ठाव आम्हासी --- फक्त भारतीय

नाना भाषा वेशभूषा ही
परंतु आमुची एक संस्कृती
एकच आमुची विचारसरणी --- फक्त भारतीय

आमुची आहे एकच आई
ऐशी कोटी लेकुरवाळी
एकच धागा आम्हास गुंफी --- फक्त भारतीय

धर्म असू दे — फक्त भारतीय
कर्म असू दे — फक्त भारतीय
शब्द असू दे — फक्त भारतीय
रक्त असू दे — फक्त भारतीय
निशाण असू दे — फक्त भारतीय

— [signature]
प्रभाकर जामखेडकर,
मुंबई. १९८८